# प्रसिध्दी निवेदन

## पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील इ.११वीचे सन २०१६-१७ चे प्रवेश ऑनलाईन पध्दतीने होत आहे.

**इ.११वी ऑनलाईन प्रवेशाबाबत पालक/विदयार्थी यांचेसाठी महत्वाच्या सूचना :**

१) पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील सर्व माध्यमिक शाळांतील विदयार्थ्यांसाठी माहिती पुस्तिका त्या-त्या शाळांमध्ये उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. सोमवार दि.९.५.२०१६पासून शालेय वेळेत विदयार्थ्यांनी माहिती पुस्तिका घ्याव्यात. (जे विदयार्थी फॉर्म नं. १७ भरुन इ.१०वी मार्च, २०१६ परीक्षेला प्रविष्ट झालेले असतील त्यांनी ज्या शाळा/केंद्रातून फॉर्म भरला असेल त्या शाळेतून माहिती पुस्तिका घ्यावी. )

२) पुणे व पिंपरीचिंचवड महानगरपालिका क्षेत्राबाहेरील विदयार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य मंडळाच्या त्यांच्या सोईच्या झोन केंद्रातून इ.१०वी परीक्षेचे मूळ प्रवेशपत्र (हॉलतिकीट) दाखवून माहितीपुस्तिका घ्यावी. (झोन केंद्राची माहिती www.dydepune.com या वेबसाईटवर उपलब्ध आहे.)

३) इतर बोर्डाच्या विदयार्थ्यांनी (महाराष्ट्र स्टेट बोर्डा व्यतिरिक्त सीबीएसई/ आयसीएसई /आयबी / आयजीसीएसई /एनआयओएस /महाराष्ट्र राज्याबाहेरील एसएससी बोर्ड)
झोननिहाय निश्चित केलेल्या मार्गदर्शन केंद्रातून इ.१०वी परीक्षेचे मूळ प्रवेशपत्र(हॉलतिकीट दाखवून माहिती पुस्तिका घ्यावी. (झोननिहाय मार्गदर्शन केंद्राची(other Boardसाठी) माहिती www.dydepune.com या वेबसाईटवर उपलब्ध आहे.)

४) माहिती पुस्तिकेची किंमत रु.१००/- आहे.

५) मंगळवार दि. १० मे, २०१६रोजी माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापकांचे प्रशिक्षण मुक्तांगण हायस्कूल, सहकारनगर, पुणे येथे घेतले जाणार आहे. त्यांचे वेळापत्रक शिक्षण उपसंचालक कार्यालयाच्या(www.dydepune.com) या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल.

६) दि.११ मे ते १४ मे २०१६ या कालावधीत पालक, विदयार्थी यांचेसाठी झोननिहाय उद्बोधन वर्गाचे आयोजन करण्यात आलेले आहे, त्याचे वेळापत्रक (www.dydepune.com) वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल.

७) दि. १६ मे २०१६ पासून या वेबसाईटवर : http://pune.fyjc.org.in वर इ.११ वी प्रवेशासाठी ऑनलाईन प्रवेशअर्ज भाग१ भरता येईल, तसेच भाग २ इ. १०वीचा ऑनलाईन निकाल लागल्यानंतर भरावयाचा आहे.

८) इ.११वीचे सर्व प्रवेश (केंद्रीय, इनहाऊस, व्यवस्थापन व अल्पसंख्यांक ऑनलाईन पध्दतीने होणार असल्यामुळे प्रत्येक विदयार्थ्याला माहिती पुस्तिका घेणे व प्रवेश अर्जाचा भाग १ व भाग २ भरणे व सबमिट करणे बंधनकारक आहे.

(मिनाक्षी राऊत)
सहा.शिक्षण संचालक,
शिक्षण उपसंचालक पुणे विभाग, पुणे.